नवीन महाविद्यालयास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक : एनजीसी २०१३/(९७/१३)/भाग-अ/मशि-४ (२)
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : ७ ऑक्टोबर, २०१३

संदर्भ: १. शासन निर्णय क्र. एनजीसी २०१०/(१९३/१०)/मशि-४, दि. ३० ऑक्टोबर, २०१०.
२. शासन निर्णय क्र. एनजीसी २०११/(२४०/११)/मशि-४, दि. २५ ऑक्टोबर, २०११.
३) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे क्र. संलग्नता I/आय.सी.डी./२०१३-१४ /१/३०५,दि. ३०.४.२०१३
४)कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे क्र. संलग्नता I/आय.सी.डी./ २०१३-१४/१/१०५३,दि. २०.६.२०१३

## शासन आदेश

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी नवीन महाविद्यालय मंजूर करण्याबाबतचे पात्र प्रस्ताव मुंबई विद्यापीठाने त्यांच्या संदर्भीय पत्र क्र. ३अन्वये शासनास सादर केले होते. तथापि, काही संस्थांनी शासनास सादर केलेल्या निवेदनावरील विचारणेच्या अनुषंगाने विद्यापीठाने संदर्भीय क्र. ४ येथील पत्रामध्ये त्या संस्थांच्या प्रस्तावाबाबतची वस्तुस्थिती शासनाच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर केली. त्यात राजस्थानी संम्मेलन, मालाड या संस्थेच्या नवीन महाविद्यालयाच्या प्रस्तावाबाबत पुढीलप्रमाणे कळविले आहे-

"प्रस्ताव छाननी समितीने तपासला असता सकारात्मक होता. तसेच तज्ञ समितीने प्रत्यक्ष जाऊन भेट देऊन अहवाल सादर केला असता अहवालावर शेरा दिलेला नाही. परंतु नविन महाविद्यालयात सुरु करावयाचे अभ्यासक्रम नविन असल्यामुळे व विद्यापीठाच्या विद्वत संभेपुढे मान्यतेकरीता प्रस्तावित असल्यामुळे व्यवस्थापन परिषदेने सदर प्रस्ताव अपात्र केला आणि त्याअनुषंगाने विद्यापीठाने सदर प्रस्ताव शासनास सादर केलेला नाही. तद्नंतर विद्यापीठाच्या विद्वत परिषदेने सदर अभ्यासक्रमास दि.७ जुन, २०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे."

२. संस्थेच्या प्रस्तावास विद्यापीठाच्या छाननी समितीची शिफारस जरी होती तरी विचाराधीन संस्था जे अभ्यासक्रम सुरु करणार होती ते अभ्यासक्रमच विद्यापीठाकडे त्यावेळी तयार नव्हते, केवळ त्या कारणास्तव व्यवस्थापन परिषदेने प्रस्ताव अपात्र केला. परंतु त्याचवेळी अभ्यासक्रम बनविण्याचा प्रस्ताव विद्वत परिषदेसमोर विचारार्थ होता व त्यांनी त्यांच्या दिनांक ७.६.२०१३ च्या बैठकीत त्यास मान्यता दिलेली आहे. विद्यापीठाने एक तर अभ्यासक्रम तयार नसताना जाहिरात काढण्यास नको होती. तसेच जाहिरात काढल्यानंतर संबंधिताकडून शुल्क भरुन घेऊन अर्ज स्विकारायला नको होता किंवा विद्वत परिषदेसमोर जो प्रस्ताव विचाराधीन होता त्या अभ्यासक्रमास मान्यता मिळण्याच्या अधीन राहून विद्यापीठाने प्रस्ताव शिफारशीत करायला हवा होता. थोडक्यात संबंधित संस्था मंजूरीसाठीच्या सर्व पुर्तता करीत असतानाही केवळ विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रमास प्रलंबित असलेल्या मान्यतेमुळे संबंधित संस्थेचा प्रस्ताव विद्यापीठाकडून राज्य शासनास पाठविण्यात आला नाही, जो वरील परि. १ प्रमाणे प्राप्त

Devprasad Goenka Management College Of Media Studies Malad (w)

झाला आहे. वरील सर्व परिस्थिती विचारात घेऊन, संस्थेचा प्रस्ताव स्विकारुन महाराष्ट्र विद्यापीठ कायदयाच्या कलम ८२(५) च्या तरतुदीनुसार शासनास प्राप्त झालेल्या अधिकारात शासन संस्थेच्या नवीन महाविद्यालयास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देत आहे.

| अ.क्र. | संस्थेचेनाव | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम / विषय |
|---|---|---|---|
| मुंबई विद्यापीठ, मुंबई | | | |
| १. | राजस्थानी संम्मेलन, मालाड | देवी प्रसाद गोयंका मॅनेजमेंट कॉलेज ऑफ मिडीया स्टडीज, मालाड (प), मुंबई | १) बॅचलर ऑफ फिल्म टेलिव्हीजन ॲण्ड न्यु मिडीया प्रॉडक्शन,<br>२) बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मिडीया ॲण्ड ॲडव्हरटाईजिंग |

अटी व शर्ती:-

१. राजस्थानी संम्मेलन, मालाड या संस्थेने विभागीय सहसंचालक, मुंबई यांच्याकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.
२. विभागीय सहसंचालक, मुंबई यांना संस्थेकडून हमीपत्र प्राप्त झाल्याशिवाय व विभागीय सहसंचालक, मुंबई यांचे तसे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय मुंबई विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.
३. मुंबई विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयाने अध्यापक / कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालक, मुंबई यांनी करावी व तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.
४. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.
५. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (ॲफिलिएशन ऑफ कॉलेजेस बाय युनिव्हर्सिटीज) रेग्युलेशन २००९ मध्ये महाविद्यालयास संलग्नीकरण देण्याबाबत विहित केलेल्या निकषांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयास संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करु नये.
६. नवीन मंजुर करण्यात आलेल्या महाविद्यालयाने त्याची स्थापना होऊन ५ वर्ष पुर्ण होताच एका वर्षात नॅक ॲक्रिडिटेशन प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज सादर करावा. अशाप्रकारे अर्ज सादर न केल्यास महाविद्यालयाची मान्यता आपोआप रद्द होईल.

३. विद्यापीठाने संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांना पाठवावा.

Deviprasad Goenka Management College Of Media Studies Malad (W)

४. विद्यापीठाने व विभागीय सहसंचालक, मुंबई यांनी नवीन महाविद्यालयाचा नियतकालिक आढावा घेऊन सदर महाविद्यालयास नियमानुसार मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर महाविद्यालयाची मान्यता रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३१००७१७०६१६८५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नि. भा. मराळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई
४)अध्यक्ष/ सचिव, राजस्थानी संम्मेलन, मालाड.
५) निवड नस्ती (मशि-४)

Devyani Goenka Management College Of Media Studies
Malad (w)

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० :**
**अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ विषयांना मान्यता देणेबाबत.**

BHM
8/100/13

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३१/१९)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक: १५ जून, २०१९.

संदर्भ : शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३.०९.२०१७.

**शासन आदेश**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ अणि संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी नवीन विषय/अभ्यासक्रमांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करण्यात आली. विद्यापीठांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर केलेली छाननीनुसार पात्र ठरलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) तसेच त्याखालील परंतुकान्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात पुढील विवरणात नमूद केल्यानुसार नवीन विषय/अभ्यासक्रमांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून **कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी** देण्यात येत आहे.

| अ.क्र. | क्रमांक | संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम/विषय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | मुंबई विद्यापीठ, मुंबई | |
| १ | १ | आर.ए.पोदार कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, माटुंगा, मुंबई-४०० ०१९ | **बी.कॉम (ॲक्च्युरीयल स्टडीज)** |
| २ | २ | किशिनचंद चेल्लाराम कॉलेज विद्यासागर प्रिसीपल के.एम.कुंदनानी चौक, १२४,दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० | एम.ए.(सायकोलॉजी) (०-६०)<br>एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) (०-२०)<br>एम.एस्सी.(स्टॅटीस्टीक्स) (०-२०) |
| ३ | ३ | एच आर. कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकॉनॉमिक्स, १२३, विद्यासागर, प्रा. के.एम. कुंदणाणी चौक, १२३, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई | एम. कॉम. (बँकिंग ॲन्ड फायनान्स) (०-६०) |
| ४ | ४ | श्रीमती पी.डी.हिंदुजा ट्रस्टचे के.पी.बी. हिंदूजा कॉलेज ऑफ कॉमर्स ३१५, न्यु चर्णी रोड, मुंबई - ४०० ००४. | एम.ए. (बिझनेस इकॉनॉमिक्स) (०-६०)<br>एम.ए. (रुरल डेव्हलपमेंट) (०-६०)<br>एम.फील (०-२०)<br>एम.कॉम. ( ई-कॉमर्स) (०-६०) |

Devprasad Goenka Management College Of Media Studies
Malad (W)

| अ.क्र. | क्रमांक | संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम/विषय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १३ | १३ | देवीप्रसाद गोएंका मॅनेजमेंट कॉलेज ऑफ मिडीया स्टडीज, आर.एस. कॅम्पस, एस.व्ही.रोड, (मालाड), मुंबई-४०० ०६४ | नविन अभ्यासक्रम-बी.एम.एम. (०-६०) एम.ए. (फिल्म टेलिव्हिजन अँन्ड न्यु मिडीया प्रोडक्शन) (०-६०) एम.ए.(कम्युनिकेशन अँण्ड जर्नालिजम) (०-६०) |
| १४ | १४ | अथर्व एज्यूकेशनल ट्रस्टचे अथर्व कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँन्ड कॅटरींग टेक्नोलॉजी प्लॉट नं. ८/१२ सर्वे नं. २६३ मालाड मार्वे रोड, चारकोप नाका, मालाड (प), मुंबई-४०० ०९५. | नविन अभ्यासक्रम बी.ए. (फिल्म टेलिव्हिजन अँन्ड न्यु मिडीया प्रोडक्शन) (०-६०) बी.ए. (कलीनरी आर्टस) (६०) |
| १५ | १५ | कांदिवली एज्यूकेशन सोसायटीचे भानुमती किशनदास श्रॉफ कला महाविद्यालय आणि मगनलाल हरगोविंददास श्रॉफ वाणिज्य महाविद्यालय भुलाभाई देसाई रोड, कांदिवली (प.) मुंबई -४०० ०६७ | बी. कॉम (ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट) (०-६०) |
| १६ | १६ | ठाकूर एज्यूकेशनल ट्रस्टचे ठाकुर कॉलेज ऑफ सायन्स अँन्ड कॉमर्स ठाकुर श्यामनारायण मार्ग, ठाकुर व्हिलेज, कांदिवली (पू.) मुंबई ४०० १०१ | बी.एस्सी (अॅक्चुरीयल सायन्स) (६०) बी.एस्सी (डाटा सायन्स) (०-६०) एम.कॉम ( अॅडव्हान्स अकांउटन्सी )(६०) |
| १७ | १७ | कांदिवली एज्यूकेशन सोसायटीचे लॉ कॉलेज- शांतीलाल मोदी रोड, कांदीवली (प.), मुंबई - ०६७ | विधी (डिप्लोमा कोर्स इन इंटॉलेक्चुल प्रोपर्टी राईटस) (०-६०) |
| १८ | १८ | झगडू सिंग चॅरीटेबल ट्रस्टचे ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स ९० फिट रोड, ठाकूर कॉम्लेक्स, कांदीवली (पू.), मुंबई- ४००१०१ | बी.ए. (कलीनरी आर्टस) (०-६०) बी.एस्सी. (कॅम्प्युटर सायन्स ) (०-६०) बी.एस्सी. (आय. टी) (०-६०) बी.एस्सी. (हॉस्पिटॅलीटी स्टडीज) (६०) |
| १९ | १९ | जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्स मु. पो.खर्डी, ता. शहापूर जि. ठाणे-४२१ ६०१. | बी.कॉम .(अकांउटिंग अँन्ड फायनान्स ) (०-६०) |
| २० | २० | आदर्श शिक्षण मंडळाचे कोनार्क आयडीएल कॉलेज ऑफ सायन्स अँण्ड कॉमर्स आदर्श विद्यानगरी, पोस्ट-व्दारली,व्हाया कल्याण रेल्वेस्टेशन, हाजी मलंग रोड, जि. ठाणे-४२१ ३०६ | बी.एम.एम. (०-६०) बी.कॉम. (अकांउटिंग अँन्ड फायनान्स ) (०-६०) |
| २१ | २१ | ज्ञान गंगा एज्यूकेशन ट्रस्टचे डिग्री कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्स हायपर सिटी मॉलच्यामागे, कासार-वडावली नाका, जी.बी.रोड, जि. ठाणे (प.) ४०० ६१५ | बी.कॉम .(अकांउटिंग अँन्ड फायनान्स ) (०-६०) |

Deviprasad Goenka Management College Of Media Studies Malad (W)